# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ०१ मार्च, २०२३ / फाल्गुन १०, १९४४ ( शके )**

**(१) उप मुख्यमंत्री**
**(२) आदिवासी विकास मंत्री** } **यांचे प्रभारी विभाग**
**(३) बंदरे, खनिकर्म मंत्री**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३०**

---

### आखरवाडी (ता. खेड, जि.पुणे ) येथील चासकमान धरणाचा उजवा कालवा फूटुन शेतपिकांचे झालेले नुकसान

**(१) * ५७३४६ श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.चेतन तुपे (हडपसर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आखरवाडी (ता.खेड, जि.पुणे) शिवारातील चासकमान धरणाचा उजवा कालवा दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास फुटल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतांमध्ये पाणी शिरून शेतीमालाचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसानीचे पंचनामे करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याबाबत तसेच कालव्याच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

आखरवाडी (ता. खेड) शिवारातील चासकमान धरणाचा उजवा कालवा किमी ००/४५० येथे दि.१०/०१/२०२३ रोजी फुटलेला होता. त्यामुळे लगतच्या शेतकऱ्यांच्या शेतात पाणी शिरुन शेतीमालाचे काही प्रमाणात नुकसान झालेले आहे.

(२) कृषी विभाग व महसुल विभाग यांचे कडून संयुक्त पाहणी करुन पंचनामे केले आहेत. कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना देय होणाऱ्या नुकसान भरपाईबाबत रु.२४,८४०/- इतके मुल्यांकन प्राप्त झाले आहे. बाधित शेतकऱ्यांना सदर नुकसान भरपाई निधी वितरीत करण्यात येत आहे.

सदर कालवा फुटीचे दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सद्यस्थितीत कालवा सुस्थितीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भारतीय तंत्रज्ञान संस्था (आय. आय. टी) पवई (मुंबई) येथे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थीनीचा झालेला विनयभंग**

**(२) * ५७९५३ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय तंत्रज्ञान संस्था (आय.आय.टी.) पवई, मुंबई येथे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थीनीचा सानपाडा पोलिसांनी विनयभंग केला असून सदरची विद्यार्थीनी सानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार देण्यास गेली असता सानपाडा पोलिसांनी दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास तक्रार घेतली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी पवई पोलिसांनी दिनांक २ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास गुन्हा दाखल करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थीनीचा विनयभंग करणाऱ्या पोलीसावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर प्रकरणी परिमंडळ १ वाशी मधील सानपाडा पोलीस ठाणे कडील रात्रौ गस्त अधिकारी यांनी फिर्यादी मुलगी व तिचा मित्र यांची तक्रार नोंद करीत असताना, ते घरी जाऊन त्यांचे पालकांसमवेत सल्लामसलत करुन तक्रार देणेकरता दुपारी पोलीस ठाणेस येतो असे सांगून दिनांक ३०.१२.२०२२ रोजीच्या सकाळी ४.३० ते ४.४५ वा. सुमारास पोलिस ठाणेतून निघून गेल्यामुळे विद्यार्थीनीची तक्रार नोंद करता आली नाही. सानपाडा पोलीस ठाणे, नवी मुंबई येथील पोलीस शिपाई यांचे विरुध्द पवई पोलीस ठाणे येथे दि.३०.१२.२०२२ रोजी गुरनं ००/२२ भादवि कलम ३५४ अन्वये फिर्याद नोंदविण्यात आली आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी पवई पोलीस ठाणे येथे नोंद गुन्हा दि. ३१.१२.२०२२ रोजी सानपाडा पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे गु.र.नं. २१४/२०२२ वर्ग करण्यात आलेला आहे.

गुन्ह्यातील आरोपी यास दि. ३१.१२.२०२२ रोजी अटक करण्यात आले असून मा. न्यायालयाने ०२ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. तसेच अटक आरोपीस शासकीय सेवेतून दि. ३१.१२.२०२२ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे. गुन्ह्यातील आरोपी यांचेविरुध्द विभागीय चौकशी चालु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ब्रम्हवाकडी (ता.सेलू, जि.परभणी) येथील निम्न दुधना धरण कालव्यांच्या अस्तरीकरणाबाबत**

**(३) * ५७९०४ डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रम्हवाकडी (ता.सेलू, जि.परभणी) येथे कोटयवधी रुपये खर्च करुन बांधण्यात आलेल्या निम्न दुधना धरणाचे कालवे वापराआधीच नादुरुस्त झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नादुरुस्त कालवे व वितरिकांच्या अपूर्ण कामांमुळे अद्यापही अपेक्षित क्षेत्रापर्यंत पाणी पोहोचत नसल्याने शेतकरी सिंचनापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन तातडीने कालव्यांची दुरुस्ती व वितरिकांची कामे पूर्ण करण्याबाबत तसेच दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही,

सन २०२२-२३ मध्ये कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत एकूण १६,५०० हे. एवढ्या क्षेत्रावर रब्बी ४ व उन्हाळी ३ पाणी पाळी सिंचन करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार रब्बी ३ पाणी पाळी पूर्ण झालेल्या असून, यासाठी शेतकऱ्यांच्या मागणी नुसार २४.२९७ द.ल.घ.मी. पाणी वापर करण्यात आलेला आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

निम्न दुधना प्रकल्पाचे वितरण व्यवस्थेवरील अस्तरीकरणाची कामांतर्गत उजवा व डाव्या कालव्याची एकूण लांबी ४०३ कि.मी. पैकी ३१८.५० कि.मी. लांबीतील कामे पूर्ण झालेली आहे. शिल्लक अस्तरीकरण लांबी ८४.५० कि.मी. लांबीतील कामे प्रगत असून, मार्च, २०२४ अखेर पुर्ण करण्याचे नियोजन आहे.
अस्तरीकरण कामे शिल्लक असलेल्या वितरिका/लघु वितरिका/ लघु कालवा यांची कामे प्रगत असल्याने, सदरील वितरण व्यवस्थेवर पाणी पाळी दरम्यान पूर्ण क्षमतेने पाणी पोहचण्यास अडथळा निर्माण होतो.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई पोलिसांनी खारघर येथून अंमली पदार्थ जप्त केल्याबाबत

**(४) * ५६५५८ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने खारघर सेक्टर १२ मधिल एका रो हाऊसवर छापा टाकून १ कोटी ७० लक्ष रूपयांचे गांजा, चरस, हेरॉईन व मेथाक्युलॉन हे अंमली पदार्थ दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास जप्त केले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी परदेशी नायजेरीयन नागरीकांना अटक करण्यात आली असून अंमली पदार्थ विक्री व्यवसायात परदेशी नायजेरीयन नागरीकांचा मोठया प्रमाणात सहभाग सातत्याने दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बेकायदा वास्तव्य करणाऱ्या परदेशी नागरिकांसाठी स्थानबध्दता केंद्र सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बेकायदेशीररित्या वास्तव्य करणाऱ्या अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या परदेशी तसेच व्हिसा संपलेल्या नागरीकांना त्यांच्या मुळ देशात परत पाठविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अंमली पदार्थांच्या वाढत्या घटनांवर आळा घालण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) दि.३०.१२.२०२२ रोजी खारघर पोलीस ठाणे यांनी खारघर सेक्टर १२ येथील एका रो हाऊसवर छापा टाकून रू.१ कोटी ७० हजार किंमतीचे गांजा, चरस, हेरॉईन, मेथ्याक्युलॉन हे अंमली पदार्थ जप्त केले आहेत. सदर प्रकरणी दि.३१.१२.२०२२ रोजी एन.डी.पी.एस. कायदा, १९८५ च्या कलम ८(क),२०(ब), २२(ब), २९ सह भा.दं.वि.कलम १४३, १४७, १४९, ३५३, ३४ सह पारपत्र (भारतात प्रवेश) अधिनियम, १९५० च्या कलम ३ व ६ सह परदेशी नागरीक कायदा, १९४६ कलम १४ (अ) (ब) (क) अन्वये गु.र.क्र.४१६/२०२२ दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी एकूण १३ नायजेरीयन व ३ इतर देशातील नागरीकांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा तपास सुरू आहे.
(३) कारागृहातून शिक्षा भोगून मुक्त झालेल्या विदेशी नागरीकांना मायदेशी परत पाठविण्यापूर्वी स्थानबध्द करण्यासाठी राज्यात तात्पुरत्या स्वरूपातील स्थानबध्दता केंद्र (Detention Centre) स्थापन करण्याचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.
(४) संबंधित पोलीस ठाण्यामार्फत गुन्हा दाखल करून शिक्षेचा कालावधी संपल्यावर अशा नागरीकांना त्यांच्या मूळ देशाच्या भारतातील उच्चायुक्त यांच्यामार्फत त्यांच्या देशात पाठविण्याची कार्यवाही करण्यात येते.
(५) राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकांमध्ये स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केलेला आहे. अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अंमली पदार्थांबाबतचे "समन्वय अधिकारी" म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. राज्यामध्ये ॲन्टी नार्कोटीक्स टास्क फोर्सची स्थापना करण्यात आली आहे. तसेच केंद्र शासनाच्या दि.२५.०३.२०२२ च्या आदेशानुसार अंमली पदार्थांवर आळा घालण्यासाठी राज्यस्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समिती व जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समितीची स्थापना करण्यात आली असून सदर समित्यांकडून अंमली पदार्थांवर आळा घालण्याबाबत वेळोवेळी आढावा घेतला जातो.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील विकासकांना महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणामार्फत पाठविण्यात आलेल्या नोटीसा

**(५) * ५६६४९ श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडे (महारेरा) गृहनिर्माण प्रकल्पांची नोंदणी केल्यानंतर महारेरा कायद्याच्या कलम ११ मधील तरतुदीप्रमाणे प्रकल्पाच्या प्रवर्तकाने नोंदणीच्या वेळी पुरविलेली माहिती दर तीन महिन्यांनी वेबसाईटवर नियमित स्वरूपात अद्ययावत करणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घर खरेदीदारांची फसवणूक टाळण्यासाठी महारेराने कठोर नियम केले असून त्याचाच एक भाग म्हणून महारेराच्या संनियंत्रण यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी सन २०१७ पासून नोंदणी झालेल्या प्रकल्पांचा

आढावा घेणे सुरू केल्यानंतर १८ हजाराहून अधिक प्रवर्तकांनी याकडे दुर्लक्ष केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महारेराच्या नियमानुसार बांधकाम प्रकल्पांची माहिती अद्ययावत न केल्याने पुण्यातील सुमारे दोन हजार विकासकांना माहे जानेवारी २०२३ मध्ये वा त्या दरम्यान महारेराकडून नोटीस बजावण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासन तथा महारेरा प्राधिकरणाने १८ हजार विकासकांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्याव्यतिरिक्त त्यांच्याकडून ३० टक्के दंड वसूल करुन नोटिस बजाविल्यानंतर ३० दिवसाच्या कालावधीत प्रकल्पाची माहिती त्वरित अदययावत करण्याच्यादृष्टीने आदेश देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी विकासकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र स्थावर सपंदा नियामक प्राधिकरणाकडे नोंदणी असलेल्या विकासकांनी माहिती अद्यावत न केल्याबाबत पुण्यातील ४६२६ विकासकांना नोटीस बजावल्या आहेत.

(४) व (५) माहिती अद्ययावत न केल्याबाबत राज्यातील १९५३९ विकासकांना नोटिस दिलेली असून नोटीस दिल्यानंतर ३१४ विकासकांनी महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाच्या संकेतस्थाळावर माहिती अद्यावत केली आहे.

जे विकासक महाराष्ट्र स्थावर सपंदा नियामक प्राधिकरणाद्वारे दिलेल्या नोटीशीच्या अनुषंगाने माहिती अद्यावत करणार नाहीत, अशा विकासकांवर स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ मधील कलम ६० व कलम ६१ अन्वये कारवाई करण्यात येईल, अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोवंडी-शिवाजीनगर (मुंबई) येथील आर.एन. या खाजगी रुग्णालयात एका नवजात बालकाचा झालेला मृत्यु

**(६) * ५६७९७ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोवंडी-शिवाजीनगर (मुंबई) येथील आर.एन. या खाजगी रुग्णालयात बोगस डॉक्टरने केलेल्या प्रसुती आणि उपचारामुळे श्रीमती राबिया शेख या महिलेच्या नवजात बालकाचा मृत्यु झाल्याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दिनांक १७ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, मुंबईतील मानखुर्द, गोवंडी, आदि विभागांसह मुंबईत अनेक ठिकाणी बोगस डॉक्टरांमुळे रुग्णांच्या जीवितास धोका निर्माण झाला असून याकरिता स्वतंत्र पथकामार्फत विशेष मोहिम राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सदर प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाणे, गोवंडी, मुंबई येथे दिनांक १८/१२/२०२२ रोजी गु.र.क्र. १२७१/२२, भा.दं.वि. कलम ३०४(२), ३४ व महाराष्ट्र मेडिकल प्रैक्टिशनर्स ॲक्ट १९६७ कलम ३३, ३६ व महाराष्ट्र नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट कलम ५ अन्वये चार आरोपींविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. यापैकी तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.
(३) बोगस डॉक्टरांविरोधात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत पोलीसांच्या मदतीने कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील रस्ते अपघातात झालेली वाढ

**(७) * ५६९२१ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.चेतन तुपे (हडपसर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रस्ते अपघातात मोठ्या प्रमाणात वाढ होत असून दोन वर्षात ५९,५९७ रस्ते अपघात होऊन त्यात २७ हजार प्रवाशांचा मृत्यू झाल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात सन २०२१ मध्ये तसेच माहे जानेवारी ते नोव्हेंबर, २०२२ मध्ये रस्ते अपघातांत ४७,७९३ प्रवासी जखमी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रस्ते अपघातांना आळा घालण्याकरिता शासनामार्फत कोणती उपाययोजना केलेली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) अपघातांचे वाढते प्रमाण आटोक्यात आणण्यासाठी शासनाने खालीलप्रमाणे उपाययोजना केल्या आहेत.

- अपघातांचे प्रमाण कमी करण्याकरिता तसेच अपघातग्रस्तांना वैद्यकिय सेवा उपलब्ध करून देणे हे उद्देश समोर ठेऊन जनजागृतीकरिता जानेवारी महिन्यामध्ये रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येते.
- संपूर्ण राज्यातून एकूण १००४ ब्लॅक स्पॉटची माहिती संकलित करून रस्ते अपघातांचे विश्लेषण करण्यात येऊन सदर ठिकाणी करावयाच्या तातडीच्या, अल्प व दिर्घ मुदतीच्या उपाययोजना करण्यात येत आहेत.
- प्राणांतिक व गंभीर अपघातांचे विश्लेषण करण्यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यांतर्गत एक अधिकारी व तीन अंमलदार यांचे विशेष पथक निर्माण करण्यात आलेले आहे.
- सर्व महामार्गांवर व रस्त्यांवर जड / अवजड वाहनांना उजवीकडील मार्गिकेमधून मार्गक्रमण करण्यास मनाई करण्याबाबत तसेच सरळ रस्त्यांवरील व घाट मार्गातील वेगमर्यादा निश्चित करण्याबाबत अधिसूचना

निर्गमित करून त्याबाबत जनजागृती करण्यात आलेली आहे.

- वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई करण्याकरिता संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये "एक राज्य एक ई चलान" प्रकल्प सुरू करण्यात आलेला आहे.
- अपघात ग्रस्त व्यक्तींना हाताळण्याबाबत महामार्गावरील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना रस्ता सुरक्षा विषयक व प्रथमोपचाराबाबतचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिंचपोकळी (मुंबई) येथील डॉक्टर कंपाऊंडमधील जुन्या प्रोग्रेसिव्ह उपकरप्राप्त चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पाबाबत

**(८) * ५८९८० श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचपोकळी (मुंबई) डॉक्टर कंपाऊंडमधील जून्या प्रोग्रेसिव्ह या उपकरप्राप्त चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पात भाडेकरुंच्या पुनर्वसनाच्या चटई क्षेत्रामध्ये मुक्त मोबदला चटई क्षेत्राचा (Fungible FSI) समावेश करु नये तसेच जुन्या इमारतीतील सर्व १९९ वहिवाटदारांचे इमारतीमध्ये पुनर्वसन झाल्याशिवाय आणि अधिकचे क्षेत्र ४५९५ चौ.मी. क्षेत्र म्हाडाच्या मुंबई इमारत दुरूस्ती व पुर्नरचाना मंडळाकडे स्वाधीन केल्याशिवाय विकासकास ना-हरकत प्रमाणपत्र देऊ नये या अटीवरच शासनाने माहे एप्रिल २०१४ मध्ये प्रस्तावास मान्यता दिली असतानाही सदरहू अटीचे विकासकाने उल्लंघन केल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी विकासकाने १९९ पैकी १०४ भाडेकरुंचे पुनर्वसन करण्यासाठी पुनर्वसनाच्या इमारतीचे बांधकाम अद्यापही न करता आणि २३७६ चौ.मी. क्षेत्राचे हस्तांतरण बांधकाम मंडळाला न करता विकासकाने विक्री इमारतीतील गाळयांची विक्री करुन आर्थिक गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने उच्चस्तरीय चौकशी करुन भाडेकरुंचे पुनर्वसन तसेच म्हाडाला देय चटईक्षेत्र ताब्यात घेण्याबाबत तसेच दोषी विकासक आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) भूकर पाहणी क्रमांक १ए/७८२, २/७८३, ७८३, ७८४, ७८५ आणि ७८६ माझगांव विभाग या मिळकतीच्या पुनर्विकासासाठी विकासकास दि.२४.११.२००६ अन्वये मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केले. दरम्यान चटईक्षेत्र निर्देशांक ३.०० किंवा मुळ रहिवाशांच्या पुनर्विकासासाठी लागणारे क्षेत्रफळ अधिक ५० टक्के प्रोत्साहनात्मक चटईक्षेत्र यापैकी जे जास्त असेल त्यानुसार मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने सुधारित ना-हरकत प्रमाणपत्र दि.३०.०४.२०१४ अन्वये प्रदान केले.

सदर योजनेत एकुण ०५ इमारती प्रस्तावित असून त्यापैकी ०३ इमारती (इमारत क्र.०१, ०२ व ०३) या मुळ भाडेकरु / रहिवाशांच्या पुनर्वसनासाठी राखीव असून इमारत क्र.०४ व ०५ विक्रीसाठी प्रस्तावित आहे. ना-हरकत प्रमाणपत्रधारकांने पुनर्वसनाच्या इमारत क्र.०१, ०२, ०३ व विक्रीसाठीची इमारत क्र. ०५ चे बांधकाम पुर्ण केलेले असून इमारत क्र.०१, ०२ व ०३ या नवीन पुनर्विकसित इमारतीत एकूण १९९ भाडेकरु / रहिवाशांना विकासकामार्फत कायमस्वरुपी निवासस्थान पुरविण्यात आले आहे.

या योजनेमध्ये ३५९५.६५ चौ.मी. अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास सुपूर्द करणे विकासकास बंधनकारक आहे. त्यापैकी, १२२०.६९ चौ.मी. क्षेत्रफळ विकासकाने मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास सुपूर्द केले आहे. विक्रीसाठी राखीव असलेल्या इमारतीपैकी इमारत क्र.०४ मध्ये उर्वरित २३७४.९६ चौ.मी. अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ मंडळास उपलब्ध होणार आहे. सदर क्षेत्रफळ सुपूर्द केल्याशिवाय विकासकास इमारत क्र.०४ चे भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडून दिले जाणार नाही.

(३) योजनेमधील भाडेकरु/रहिवाशांकडून प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी, म्हाडा यांनी चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदिवासी बहुल क्षेत्राच्या विकासकामांचा निधी बिगर आदिवासी क्षेत्रातील कामांसाठी मंजूर केल्याबाबत

**(९) * ६०३४० श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विकास विभागाअंतर्गत आदिवासी बहुल क्षेत्राच्या विकासाकरीता लेखाशिर्ष ३०५४ योजनेअंतर्गत प्राप्त होणारा निधी आदिवासी लोकांच्या विकासाकरिता व आदिवासी उपयोजना क्षेत्रातील कामांसाठी वापरण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णय क्र. बीयुडी-२०२१/प्र.क्र.१२/ का-६ दि. ३० मार्च २०२२ व दि.३१ मार्च २०२२ व १ एप्रिल २०२२ अन्वये लेखाशिर्ष ३०५४ योजनेचा करोडो रुपयांचा निधी बिगर आदिवासी क्षेत्रातील (OTSP) कामांकरीता मंजूर करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गैर आदिवासी क्षेत्रातील कामांची चौकशी करुन ती तात्काळ रद्द करण्याचे निवेदन लोकप्रतिनिधींनी तत्कालिन मा.मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री व आदिवासी विकास मंत्री यांना पत्राद्वारे दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कामे आजतागायत रद्द न झाल्यामुळे अतिदुर्गम, संवेदनशील, डोंगराळ, तसेच अविकसीत क्षेत्रात राहणाऱ्या लाखो आदिवासी जनतेला विकासापासून वंचीत रहावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे आहे.

(२) शासन निर्णय दिनांक ३१/०३/२०२२ अन्वये मंजूर केलेल्या कामांमध्ये निकषात न बसणाऱ्या काही कामांचा समावेश असल्याबाबत लोकप्रतिनिधीकडून तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) शासन निर्णय दिनांक ३१/०३/२०२२ अन्वये मंजूर केलेली कामे ही दिनांक १३/०२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आली आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंढेगाव (ता.इगतपूरी, जि.नाशिक) येथील मध्यवर्ती स्वंयपाक गृहातून दिले जाणारे जेवण निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(१०) * ५६५३६ श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.अजित पवार (बारामती), श्री.धनंजय मुंडे (परळी), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंढेगाव (ता.इगतपूरी, जि.नाशिक) येथील मध्यवर्ती स्वंयपाकगृहा मधून जिल्हयातील सुमारे ४० आदिवासी आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना भोजन पुरवठा करण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक येथील पंचवटीमधील पेठ रोडवरील आदिवासी विकास विभागाच्या एकलव्य रेसिडेन्सिअल मॉडर्न निवासी शाळेच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना शाळेकडून पुरविण्यात आलेल्या भोजनात अळया सापडल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सतत निकृष्ट दर्जाच्या भोजनाचा पुरवठा होत असल्यामुळे विद्यार्थ्यांनी वसतिगृहात अन्नत्याग आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रशासनाकडे तक्रार केली असता तक्रारीची कोणतीही दखल न घेता संबंधित ठेकेदाराला पाठीशी घालण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार विद्यार्थ्यांना निकृष्ट भोजन दिल्याप्रकरणी संबंधितांवर कारवाई करुन विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे भोजन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) होय, हे खरे आहे.

शासकीय आश्रमशाळा मुंढेगाव, ता. इगतपूरी, जि. नाशिक येथील मध्यवर्ती स्वयंपाकगृहातून नाशिक, राजूर व जव्हार या प्रकल्पातील ३७ शासकीय आश्रमशाळा व ५ एकलव्य निवासी शाळा अशा एकूण ४२ शाळांतील विद्यार्थ्यांना भोजन व अल्पोपहार पुरविण्यात येतो.

(२) व (३) एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुल पेठरोड, ता.जि. नाशिक या शाळेत देखील उक्त प्रमाणे पुरवठा करण्यात आलेल्या मुगडाळीच्या वरणामध्ये दिनांक ०६ जानेवारी, २०२३ रोजी १ विद्यार्थ्यास अळी दिसल्याचे त्याने प्राचार्यांच्या निदर्शनास आणले व त्यानंतर विद्यार्थ्यांनी जेवणावर बहिष्कार घातला.

(४) व (५) सदर घटनेची माहिती मिळाल्याबरोबर तातडीने अपर आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांनी नाशिक प्रकल्प कार्यालयातील सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण), तसेच मध्यवर्ती स्वयंपाकगृहाचे प्लांट मॅनेजर यांच्यासह दि. ६ जानेवारी २०२३ रोजी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट दिली. अपर आयुक्त यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या व त्याप्रमाणे विद्यार्थ्यांच्या भोजनात तात्काळ सुधारणा करण्याबाबत संबंधित यंत्रणा व संबंधित सर्व अधिकारी, कर्मचारी यांना समज दिली. तसेच घटनेची सविस्तर चौकशी करण्याबाबत प्रकल्प अधिकारी, नाशिक यांना निर्देश दिले. त्यानुसार प्रकल्प कार्यालय, नाशिक यांचे स्तरावरुन सदर घटनेची चौकशी करण्यात आली आहे.

प्रकल्प कार्यालयाच्या स्तरावरुन चौकशी समितीने प्रत्यक्ष मध्यवर्ती स्वयंपाकगृह मुंढेगाव येथे घटनास्थळी,भेट देऊन चौकशी केली. चौकशीनुसार मध्यवर्ती स्वयंपाकगृहातील अन्नधान्यात अळया आढळुन आल्या नाहीत. सदर घटनेच्या दिवशी इतर ४१ शाळांनाही भोजनाचा पुरवठा झालेला होता, सदरील शाळांकडून

जेवणात अळी निघाल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. मध्यवर्ती स्वंयपाकगृहास पुरवठा केले जाणारे धान्य एफ.एस.एस.आय प्रमाणीत होते. चपाती थंड न करता गरम असतानाच भरत असल्या कारणाने वाफेमुळे त्या चिपकत असल्याचे लक्षात आल्याने त्या आता थंड करुन भरण्यात येत आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत जेवणाबाबत विदयार्थ्यांची कोणतीही तक्रार नाही.

(६) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र स्थावर संपदा प्राधिकरणाने प्रलंबित असलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी विकासकांना मुदतवाढीसाठी ५१ टक्के खरेदीदारांच्या मंजूरीची अट काढण्याबाबत**

**(११) * ५६५२२ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रलंबित प्रकल्प वेळेत पूर्ण व्हावेत आणि प्रकल्प पूर्ण करण्याची इच्छा असलेल्या विकासकांसाठी महाराष्ट्र स्थावर संपदा प्राधिकरण (महारेरा) ने मुदतवाढीसाठी ५१ टक्के खरेदीदारांच्या मंजूरीची अट काढून टाकण्याचा निर्णय दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अट काढून टाकल्यामुळे विकासकाला प्रकल्पाच्या मुदतवाढीचा थेट अधिकार मिळणार असल्याने विकासक कितीही वेळा मुदतवाढ घेऊन खरेदीदारांची फसवणूक करण्याची शक्यता निर्माण झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार महारेराने काढून टाकलेली सदर अट पुर्ववत लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ मधील कलम ६ नुसार प्रलंबित प्रकल्पांना महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणामार्फत १ वर्षाची मुदतवाढ देण्यात येते. प्रकल्प पूर्ण होण्यास यापेक्षा जास्त कालावधी लागत असल्याने विकासकास मुदतवाढ हवी असल्यास, ५१% पेक्षा जास्त खरेदीदारांची सहमती असणे आवश्यक आहे. तथापि, काही प्रकल्पांमध्ये खरेदीदार सहमती देत नाहीत, अशा वेळी सदनिकाधारकांच्या हितास बाधा न येता, प्रकल्प पूर्ण होण्याच्या दृष्टिकोणातून विकासक महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडे मुदतवाढीसाठी अर्ज करू शकतात. सदर अर्जाची छाननी प्राधिकरणामार्फत करून अर्जावर योग्य तो निर्णय घेण्यात येईल, असे आदेश महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाने दि.२७.१२.२०२२ रोजी निर्गमित केलेले आहेत. सदर प्रकरणी प्राधिकरणाकडून सविस्तर माहिती मागविण्यात आलेली आहे. सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प जव्हार अंतर्गत येणाऱ्या आश्रम शाळांमधील सोलार गिझर बंद पडल्याबाबत

**(१२) * ५८१६४ श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा, विक्रमगड व वाडा तालुक्यात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प जव्हार अंतर्गत आश्रम शाळेमधील विद्यार्थी-विद्यार्थीनींना आंघोळीकरिता गरम पाणी मिळावे म्हणून लाखो रुपये खर्च करुन सोलार गिझर बसविण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बरेच गिझर नादुरुस्त असल्याने विद्यार्थ्यांना थंडीच्या दिवसांत गार पाण्याने अंघोळ करावी लागत असल्यामुळे त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन विद्यार्थ्यांना गरम पाणी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१), (२) व (३) सन २०११ मध्ये शासकीय आश्रमशाळांना सोलार वॉटर हिटरचा पुरवठा करण्यात आलेला होता. कालांतराने नैसर्गिक आपती व अन्य कारणांमुळे सदरील सोलार वॉटर हिटर बंद पडल्याने त्या शाळांमध्ये इलेक्ट्रीक गिझर बसविण्यात आलेले आहेत.

सद्यस्थितीत प्रकल्प कार्यालय जव्हार अंतर्गत येत असलेल्या ३० पैकी २५ शासकीय आश्रमशाळांमध्ये इलेक्ट्रीक गिझर बसविण्यात आलेले असून एका शाळेवर सोलार वॉटर हिटर कार्यान्वित आहे. तसेच उर्वरित ४ शाळांवर गॅसद्वारे विदयार्थ्यांना गरम पाणी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्रातील आदिवासींना शासकीय योजना व सवलतींचा लाभ देण्याबाबत

**(१३) * ५७३८० श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये आदिवासी जमातींची एकूण लोकसंख्या ९.३५ टक्के असून ज्यामध्ये आदिवासी क्षेत्रामध्ये ३.९ टक्के तर आदिवासी क्षेत्राबाहेर ५.४ टक्के आदिवासी बांधव राहत असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील ५.४ टक्के आदिवासींना आवश्यक त्या दाखल्याअभावी शासनाच्या विविध योजना आणि सवलतींपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील आदिवासींना अनुज्ञेय असलेल्या सवलती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) होय.

| तपशील | लोकसंख्या | टक्केवारी |
| --- | --- | --- |
| महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या | ११२३७४३३३ | |
| अनुसूचित जमातीची लोकसंख्या | १०५१०२१३ | ९.३५ % |
| अनुसूचित क्षेत्रातील (TSP) अनुसूचित जमातीची लोकसंख्या | ४३७२००७ | ३.९ % |
| अनुसूचित क्षेत्राबाहेरील (OTSP) अनुसूचित जमातीची लोकसंख्या | ६१३८२०६ | ५.४ % |

(२) व (३) हे खरे नाही.

आदिवासी विकास विभागाच्या दि.२६.७.२००४ रोजीच्या शासन निर्णयान्वये आदिवासी उपयोजना बाहय क्षेत्रामध्ये फक्त वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यात याव्यात असे धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार आदिवासी उपयोजना बाहय क्षेत्रामध्ये जिल्हास्तरीय कृषी विभाग, उर्जा विभाग, वन विभाग, पशुसंवर्धन विभाग, ग्रामविकास विभाग, उद्योग विभाग, नगरविकास विभाग यांच्यामार्फत वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यात येतात. तसेच ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजनेंतर्गत सामूहिक तसेच वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभ आदिवासी बाहय क्षेत्रातील आदिवासी लाभार्थ्यांना दिला जातो.

त्याचप्रमाणे वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभ आदिवासी लाभार्थ्यांना मिळण्याच्या अनुषंगाने लाभार्थ्यांची निवड विविध दाखल्यांच्या आधारावरच करण्यात येते. (शिधापत्रिका, जात प्रमाणपत्र, आधारकार्ड, मनरेगा जॉब कार्ड, आयुषमान भारत कार्ड) जेणेकरुन आदिवासी उपयोजनेच्या निधीचा विनियोग फक्त आदिवासी लाभार्थ्यांसाठी होईल.

आदिवासी लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ मिळण्याच्या अनुषंगाने आवश्यक दाखले उपलब्ध करुन देण्यासाठी दि.१ सप्टेंबर, २०२१ ते दि.३१ ऑक्टोबर, २०२१ दरम्यान विशेष मोहिम राबविण्यात आली होती.

तसेच सद्य:स्थितीत दि.१ जानेवारी, २०२३ ते ३१ मार्च, २०२३ या कालावधीत विशेष मोहिम राबविण्यात येत असून अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना आधारकार्ड, शिधापत्रिका, पॅनकार्ड, बँक खात्याशी संबंधित माहिती, मनरेगा जॉब कार्ड, आयुषमान भारत कार्ड तसेच अनुसूचित जमातीचा दाखला व इतर अनुषंगिक दाखले काढण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची माहिती मिळण्याकरीता आयुक्त, आदिवासी विकास कार्यालय, नाशिक येथे दि.१०.२.२०२३ पासून टोल फ्री दूरध्वनी क्र.१८००२६७०००७ सुरु करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात शासकीय वीज कंपन्यांच्या खाजगीकरणाच्या विरोधात वीज कर्मचाऱ्यांनी पुकारलेला संप

**(१४) * ५६५७० श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), ॲड.अशोक पवार (शिरुर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत**

**जामखेड), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वीज कंपन्यांच्या खाजगीकरणाच्या विरोधात राज्यातील वीज कर्मचाऱ्यांनी अनेक ठिकाणी दिनांक ४ जानेवारी २०२३ रोजी पासून तीन दिवसांचा संप पुकारला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर, पुणे, औरंगाबाद, बीड यासाठी विज वितरणासाठी टाटा पॉवरने तयारी दर्शविलेली असून अदानी पॉवरने देखील समांतर वीज वितरणाचा परवाना मिळविण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश वीज नियामक आयोगाकडे अर्ज केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाजनको, महापारेषण, महानिर्मिती, महावितरण या कंपन्यांचे खाजगीकरण करु नये तसेच अन्य खाजगी कंपन्यांना वीज वितरण परवाना देऊ नये अशा मागण्या वीज कर्मचाऱ्यांनी शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपामुळे शहरातील, ग्रामीण भागातील व औद्योगिक वसाहतींचा वीज पुरवठा २४ ते ४८ तासांसाठी खंडित होवून आर्थिक नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यासंदर्भात मा.उर्जामंत्री यांनी महानिर्मिती, महापारेषण व महावितरण या तिन्ही कंपन्यांमध्ये ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक तसेच कंत्राटी कामगारांना कायम करण्याचे आश्वासन संपाच्या वेळी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

शासकीय वीज कंपन्यांच्या खाजगीकरणाच्या विरोधात महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी अधिकारी, अभियंता संघर्ष समिती व महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन यांनी दि.०४.०१.२०२३ रोजी त्याचदिवशी दुपारनंतर संप मागे घेतला.

(२) टाटा पॉवर कंपनीने या प्रकारचा कोणताही अर्ज मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे केलेला नाही. परंतु ठाणे/पालघर क्षेत्र तसेच नागपूर व पुणे क्षेत्राकरिता टोरेंट पॉवर कंपनीने मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे अर्ज केला आहे.

अदानी इलेक्ट्रिसिटी, नवी मुंबई लि. या कंपनीने महावितरण कंपनीच्या नवी मुंबई महानगरपालिका व मुलुंड, भांडुप, ठाणे जिल्हयाचा भाग, पनवेल, खारघर, तळोजा आणि उरण यासारखे लगतचे क्षेत्रामध्ये समांतर परवानाधारक म्हणून वितरण परवाना मंजूर करण्यासाठी मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे अर्ज दाखल केला आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे अंशत: खरे आहे.

सदर संप कालावधीत राज्यातील बहुतांश भागाचा वीज पुरवठा सुरळीत होता. तांत्रिक बिघाडामुळे काही ठिकाणी वीज पुरवठा खंडीत झाला होता. परंतु सदर संपात जे महावितरणचे अधिकारी/कर्मचारी सहभागी नव्हते, त्यांनी अथक प्रयत्न करुन व आवश्यक ठिकाणी महावितरणच्या सूचीबध्द कंत्राटदारांच्या मदतीने कमीत कमी वेळेत खंडीत झालेला वीज पुरवठा सुरळीत केला.

(५) हे अंशत: खरे आहे.

मा.उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री यांच्या स्तरावर दिनांक ०४.०१.२०२३ रोजी संघर्ष समिती व मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटना यांचे सोबत बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत महावितरण, महानिर्मिती व महापारेषण या तिन्ही कंपन्याचे बळकटीकरण करण्यासाठी या कंपन्यामध्ये शासन एकत्रितरित्या पुढील तीन वर्षात जवळपास रुपये ५० हजार कोटी गुंतवणुक करण्यात येणार आहे तसेच ज्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी विहित वयोमर्यादा ओलांडली आहे अशा कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वयोमर्यादेमध्ये कंपन्यांमार्फत एक विशेष बाब म्हणून शिथिलता देऊन त्यांचा समावेश कसा करुन घेता येईल या वर कार्यादेशीर बाबी तपासून विचार करण्यात येईल असे बैठकीत ठरविण्यात आले.

(६) विद्युत अधिनियम, २००३ कलम १४ व १५ मधील तरतूदीनुसार मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे सदर प्रकरणाबाबत निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## घोटगेवाडी व भटवाडी, (जि.सिंधुदुर्ग) येथील तिलारी धरणाच्या उजव्या कालव्याला तडे गेल्याबाबत

**(१५) * ५६६६४ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्गातील जिल्ह्यातील घोटगेवाडी भटवाडी येथील तिलारी धरणाच्या उजव्या कालव्याला मोठे तडे पडले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणाला तडे गेल्यामुळे हजारो लिटर पाणी वाया जात असून ते पाणी शेतक-यांच्या शेतामध्ये शिरुन मोठया प्रमाणात शेतीचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती उपाययोजना तसेच दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

तिलारी उजवा तीर कालवा कि.मी. ५ मधील सा.क्र. ४/१४० मी. येथील नलिका मोरी दि.२८/१२/२०२२ रोजी १२०० मि.मी. व्यासाच्या २ HPC पाईप असलेल्या ठिकाणी कालवा फुटी झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

दि.२८/१२/२०२२ रोजीच्या कालवा फुटीमुळे कालव्यातील पाणी काही प्रमाणात नलिका मोरीतून वाहून गेले आहे, तथापि शेतीचे नुकसान झालेले नाही. कालवा फुटीची घटना घडली असता येथील पाण्याचा विसर्ग बंद करणेत आला.

(३) तिलारी उजवा तीर कालवा किमी ५ मधील सा.क्र. ४/१४० मी. येथील कालवा फुटीच्या ठिकाणी दि.०१/०१/२०२३ रोजी संबंधित क्षेत्रिय अधीक्षक अभियंता यांनी क्षेत्रीय पाहणी केली असून दुरूस्तीचे काम

तातडीने सुरू करणेत आले आहे. सद्यस्थितीत काम प्रगतीत असून, काम मार्च, २०२३ अखेर पूर्ण करणेचे नियोजन आहे.

सदर कालव्याचे बांधकाम पूर्ण होऊन सुमारे ३० वर्षे झाली असून कालव्यामधून ३६५ दिवस (पावसाळा कालावधी सह) पाणी सतत प्रवाहीत असल्याने कालव्याचे अस्तरीकरण खराब होऊन कालव्यातून गळती झाली आहे. त्यामुळे कारवाई करणेचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आदिवासी विकास महामंडळ आणि शबरी महामंडळ यांचेमार्फत खावटी अनुदान वाटपात तसेच वैयक्तिक लाभाच्या योजनेत वित्तीय नियमांचे झालेले उल्लघंन**

**(१६)** * **६००३५ श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासींच्या विकासासाठी आदिवासी विकास महामंडळ व शबरी महामंडळामार्फत ठाणे आणि पालघर जिल्ह्यात सन २०२०-२१ आणि २०२१-२२ मध्ये खावटी अनुदान आणि वैयक्तिक लाभाच्या राबविण्यात आलेल्या योजनांमध्ये वित्तीय नियमांचे उल्लंघन करुन ५८ लक्ष रुपये इतका निधी वाटप करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हानिहाय वाटपाचे निकष डावलून लाभ देण्यात आल्यामुळे उक्त जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अनेक आदिवासी लाभार्थी या योजनेच्या लाभापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने संबंधित दोषींविरुद्ध कारवाई करण्यासह वंचित राहिलेल्या लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ त्वरित मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) व (२) हे खरे नाही.

कोरोना काळात आदीवासी बांधवांची उपासमार होऊ नये म्हणून १ वर्षासाठीच (२०२०-२१) खावटी अनुदान योजना राबविण्यात आली होती.प्रादेशिक कार्यालय जव्हार अंतर्गत जव्हार,डहाणू,बोरीवली ,शहापूर व पेण या दुर्गम भागात लाभार्थ्यांच्या मागणीनुसार २,२२,२०१ इतक्या खावटी किटचे वाटप करण्यात आले आहे.

दि.२२/०३/२०२० पासून देशात लॉकडाऊन जाहिर झाले.यामुळे इच्छुक उमेदवारांना कर्ज योजनेसाठी मुदतीत अर्ज सादर करता आले नाही.त्यामुळे लॉकडाऊन शिथील झाल्यानंतर दि.१७/१०/२०२० रोजी राज्यातील दैनिक लोकमत वर्तमानपत्रात पुन्हा जहिरात प्रसिध्द करून इच्छुक उमेदवारांनी अर्ज सादर करण्यासाठी दि.३१/१२/२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. यानंतरही सदर मुदत दि.३१/०१/२०२१ पर्यंत वाढविली.त्याव्यतिरीक्त इच्छुक उमेदवारांना इंटरनेट लिंक उपलब्ध करुन देऊन ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली होती.

वाटपा अभावी निधी परत जाऊ नये यासाठी ज्या शाखा कार्यालयांचे प्रस्ताव प्रथम प्राप्त होतील अशा शाखा कार्यालयांना देण्यात आलेल्या लक्षांकानुसार कर्ज मंजुर करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त स्तरावर होणाऱ्या अन्नधान्य खरेदीच्या निविदा प्रक्रिया प्रलंबित असल्याबाबत

**(१७) * ५६७९६ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनाची रुग्ण संख्या शून्यावर आली असतांना देखील आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त स्तरावर होणाऱ्या अन्नधान्य खरेदीच्या १२० कोटी रुपयांच्या निविदा प्रक्रिया प्रलंबित असल्याने आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांवर उपासमारीचे संकट ओढवले असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी विकास विभागाकडून सुरु असलेल्या ४९९ आश्रम शाळांमधील विद्यार्थी दुर्गम भागातून येत असून अनेक शाळांमध्ये भोजनासाठी लागणाऱ्या अन्नधान्याअभावी विद्यार्थ्यांची उपासमार होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय वा त्यानुसार प्रलंबित निविदा प्रक्रिया तातडीने राबवून आश्रमशाळांमधील विदयार्थ्यांना अन्नधान्य पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) शासकीय आश्रमशाळेतील विदयार्थ्यांना भोजनासाठी लागणारे अन्नधान्य, कडधान्य, किराणा माल व मसाले पदार्थ पुरवठा करणेसाठी आयुक्तालयाचे स्तरावरुन ई-निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही सुरु आहे.

शासकीय आश्रमशाळेतील विदयार्थ्यांची भोजनापासुन गैरसोय होऊ नये या दृष्टीने दिनांक २२.०५.२००६ रोजीच्या शासन निर्णयाच्या तरतुदीनुसार तातडीची बाब म्हणुन सात दिवस पुरेल एवढे धान्याची खरेदी सदर निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यत शाळास्तरावर करुन पुरवठा करणेबाबत आयुक्त आदिवासी विकास नाशिक यांच्या स्तरावरुन दिनांक ०५.०७.२०२२ अन्वये सर्व प्रकल्प अधिकारी यांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार प्रकल्प अधिकारी/मुख्याध्यापक यांचे स्तरावर अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यामुळे विदयार्थ्यांची उपासमार होण्याचा प्रश्न उदभवत नाही.

आश्रमशाळेतील विदयार्थ्यांना भोजनासाठी लागणारे अन्नधान्य, कडधान्य, किराणा माल व मसाले पदार्थ पुरविण्याच्या अनुषंगाने प्रसिध्द केलेली ई-निविदा अंतिम टप्प्यात आहे.

----------------

**प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या घरकुलांना अल्प प्रतिसाद मिळाल्याबाबत**

**(१८) * ५६६२३ श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.टेकचंद सावरकर (कामठी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्याला दिलेले उद्दिष्ट दिनांक ३१ डिसेंबर,२०२२ रोजीपर्यंत पुर्ण न झाल्याने साधारणत: १ लाख १६ हजार ९५५ घरकुले इतर राज्यात वळविण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी साधारणत: ५८ हजार ७८२ घरकुले ही विदर्भातील असून सदर योजनेअंतर्गत शहरी व ग्रामीण भागातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी परवडणारी घरे उपलब्ध करुन न दिल्यामुळे अनेक लाभार्थी यापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण विभागाच्या संचालकांनी याचा आढावा घेवून हे उद्दिष्ट पुर्ण होणार नसल्याचे सूचित केले असतानाही शासनाने त्याविषयी कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरची घरकुले परराज्यात न जाता राज्यातच पूर्ण होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**दौंड (जि.पुणे) तालुक्यातील भीमा नदीच्या पात्रात सात मृतदेह आढळल्याबाबत**

**(१९) * ५९६३६ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील भीमा नदीच्या पात्रात दिनांक १८ ते २४ जानेवारी २०२३ रोजी वा त्यादरम्यान एकूण सात मृतदेह आढळले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सात मृतदेहांमुळे पोलीसांनी ही हत्या असल्याचा संशयावरुन तपास सुरु केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशीअंती काय निष्पन्न झाले, त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, अशा घटनांना कायमस्वरूपी पायबंद घालण्यासाठी शासनामार्फत कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय. सदर प्रकरणी यवत पोलीस ठाणे, जि.पुणे येथे गु.र.नं.८३/२०२३ भा.दं.वि. कलम ३०२, १२०ब, ५०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर गुन्हयाच्या तपासात ६ आरोपी व एक विधीसंघर्षीत बालक यांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. यापैकी ५ आरोपींना अटक करण्यात आली असून विधीसंघर्षीत बालकास बाल न्यायमंडळासमोर हजर करण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.

(४) आरोपीच्या मुलाचा मृत्यू हा मयत व्यक्ती व त्याच्या मुलाने केल्याच्या संशयावरून सदर गुन्हा घडल्याचे आतापर्यंतच्या तपासात दिसून आले असून अशा घटनांना पायबंद घालण्यासाठी लवकरात लवकर तपास करुन दोषींविरूध्द कठोर कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अंबाजोगाई (जि.बीड) येथील स्वराज्य जीआरबी इंडस्ट्रीज प्रा.लि. या कंपनी अंतर्गत गुंतवणूक केलेल्या गुंतवणूकदारांची झालेली फसवणूक**

**(२०) * ५७३९१ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील स्वराज्य जीआरबी इंडस्ट्रीज प्रा.लि. या कंपनीने ग्राहकांना १०० दिवसात गुंतवणुकीच्या दीडपट आर्थिक लाभ मिळवून देण्याचे आमिष दाखवून सुमारे पाच हजार लोकांची २०० कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई व इतर पोलीस ठाण्यात आतापर्यंत सुमारे २० व्यक्तींनी फसवणुकीच्या तक्रारी दाखल केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) प्रस्तुत प्रकरणी बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशन येथे दाखल फिर्यादनुसार आतापर्यंत केलेल्या तपासात जी.आर.बी इंडस्ट्रीज प्रा.लि. या कंपनीने ७ व्यक्तींची सुमारे रुपये ३१ लाख इतक्या रकमेची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले असून पुढील तपास सुरु आहे.

(३) सदर प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.५१३/२०२२ भा.दं.वि कलम ४२०, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे सदर प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हयातील शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी वीज जोडणी देण्याबाबत

**(२१) * ५६६४१ ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात बऱ्याच शेतकऱ्यांनी कृषी पंपासाठी वीज जोडणी मिळण्याबाबत महावितरणकडे मागील २ वर्षापासून अनामत रक्कम भरुनही अद्यापही शेतकऱ्यांना वीज जोडणी देण्यात आली नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीज पुरवठ्याअभावी शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वीज वितरण कंपनीकडे उच्चदाब वितरण प्रणाली योजनेला मान्यता दिली असून त्यापैकी विदर्भासाठी २२३४ कोटी रूपये इतका निधी मंजूर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रलंबित असलेल्या कृषी पंपाच्या वीज जोडण्या माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत पूर्ण करण्याबाबत महावितरणने निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना तात्काळ विज जोडणी देण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

बुलढाणा जिल्हयामध्ये मार्च २०२० अखेर ४८२८ कृषीपंप अर्जदार पैसे भरुन प्रलंबित होते. सदर जिल्हयात सन २०२०-२१ मध्ये २९६५, सन २०२१-२२ मध्ये २८७५ व सन २०२२-२३ मध्ये २०.०२.२०२३ अखेर २६५८ कृषीपंप असे एकूण ८,४९८ कृषीपंप अर्जदारांना वीज जोडण्या देण्यात आल्या असून २०.०२.२०२३ अखेर ७,५२७ कृषीपंप अर्जदार पैसे भरुन प्रलंबित आहेत व त्यांची ऊर्जीकरणाची कामे प्रगतीपथावर आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.

उच्चदाब वितरण प्रणाली (HVDS) योजनेअंतर्गत विदर्भ व मराठवाडयाकरीता एकूण रु.२२३४ कोटी इतका निधी महावितरण कंपनीस प्राप्त झाला आहे.
(४) हे अंशत: खरे आहे.

मार्च २०२२ अखेर पैसे भरुन प्रलंबित असलेल्या कृषीपंप अर्जदारांचे मार्च- २०२३ पर्यंत महावितरणव्दारा ऊर्जीकरण पूर्ण करण्याचे नियोजित आहे.
(५) बुलढाणा जिल्हयात वीज जोडणीकरिता मार्च-२०१८ पूर्वी पैसे भरुन प्रलंबित असलेल्या ४८७९ कृषीपंप अर्जदारापैकी दि.३१.०१.२०२३ पर्यंत ४६४१ कृषीपंप ग्राहकांना उच्चदाब वितरण प्रणाली योजनेव्दारे वीज जोडणी देण्यात आले असून उर्वरित २३८ कृषीपंप ग्राहकांना वीज जोडणी देण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

तसेच, “कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२०” अंतर्गत दि. ०१.०४.२०१८ नंतर प्रलंबित असणाऱ्या अर्जदारांना वीज जोडणी देण्यात आली असून उर्वरित ३१७२ कृषीपंपांना वीज जोडणी देण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच ७७३ कृषीपंपांचे ऊर्जीकरण मार्च-२०२३ पर्यंत पूर्ण करण्याकरिता निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुदानित आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांचा झालेला मृत्यू

**(२२) * ५६९६५ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय आश्रमशाळांसोबतच अनुदानीत आश्रमशाळांमध्ये मुलांच्या आरोग्याची स्थिती चिंताजनक असून गत साडेपाच वर्षात शासकीय आश्रमशाळांमध्ये ६८० तर अनुदानीत आश्रमशाळांमध्ये ४६४ विद्यार्थ्यांना आपला जीव गमवावा लागला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी ठाणे, नाशिक, नागपूर व अमरावती या विभागांतर्गत असलेल्या आश्रमशाळांमध्ये झालेल्या मृत्युंपैकी सर्वाधिक एकूण २७८ मृत्यू हे नाशिकमधील असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यात येत नसून त्यांना ॲनीमिया, पोटाचे विकार, आतड्यांचा आजार, मुत्रपिंड निकामी होणे, तसेच फीट येणे आदी विकास झाल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभागांमार्फत चालविण्यात येणाऱ्या या अनुदानीत आश्रमशाळांचे निरीक्षण करण्यासाठी स्वतंत्र समिती नसल्यामुळे देखील या आश्रमशाळांवर प्रभावी नियंत्रण आढळून येत नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या आश्रमशाळांवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र संनियंत्रण निरीक्षक समिती नेमण्याची मागणी काही समाजसेवी संघटनांद्वारे करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांचे मृत्यु रोखण्यासंदर्भात तसेच या आश्रमशाळांवर योग्य सनियंत्रण ठेवण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) अंशत: खरे आहे.

मागील साडेपाच वर्षात राज्यातील शासकीय आश्रमशाळांमधील ६५४ तर अनुदानित आदिवासी आश्रमशाळांमधील ४२४ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे. अनुदानित आश्रमशाळांमधील ४२४ विद्यार्थ्यांपैकी पालकांच्या ताब्यात असताना ३५७ विद्यार्थ्यांचा तर शाळेच्या ताब्यात असताना ६७ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे.
(२) नाशिक विभागांतर्गत असलेल्या शासकीय आश्रमशाळांमधील २७८ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला असून त्यापैकी पालकांच्या ताब्यात असताना २५७ व शाळेच्या ताब्यात असताना २१ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) या आशयाची मागणी लोकप्रतिनिधी यांचेकडून करण्यात आली आहे. शासकीय / अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे मृत्युकारणांचा अभ्यास करून उपाययोजना सुचविण्यासाठी डॉ. सुभाष साळुंके, सेवा निवृत्त महासंचालक, आरोग्य सेवा यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने दिलेल्या अहवालानुसार यापुढे होणाऱ्या प्रत्येक मृत्यू प्रकरणाची त्वरीत दखल घेऊन प्राथमिक चौकशी करणे, विद्यार्थी मृत्यूचे वैद्यकीय सामाजिक दृष्टीने विश्लेषण करणे, प्रत्येक प्रशासकीय स्तरावर त्वरीत कार्यवाही होते किंवा कसे याबाबत त्रैमासिक आढावा घेण्याच्या अनुषंगाने दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रकल्प स्तरावर आपत्कालीन आढावा गट, वैद्यकीय सामाजिक आढावा समिती तसेच जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समिती अशा प्रकारच्या समित्या गठीत करण्यात आलेल्या असून त्याद्वारे कार्यवाही सुरू आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## म्हसळा (जि.रायगड) तालुक्यातील खारभुमी बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(२३) * ५९७५६ कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हसळा (जि.रायगड) तालुक्यातील खरसई पंचक्रोशीमधील खारभूमी लगत असलेल्या बनोटी, रेवली, आगरवाडा, गणेशनगर येथील खारभूमी बंधाऱ्याला ठिकठिकाणी तडे गेल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समुद्राचे खारे पाणी शेतजमिनीत शिरुन सुमारे ६० एकरहून अधिक जमीन नापीक झाली असून जुन्या खारभुमीचा बंधारा फुटल्याने तेथील शेतकऱ्यांना दुबार पिक घेणेही दूरापास्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाने खारभूमी बंधाऱ्याची तातडीने दुरुस्ती करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
अतिवृष्टी व उधाणामुळे बांधाला काही ठिकाणी खांडी पडून शेतीचे काही प्रमाणात नुकसान झाले आहे.
(३) खरसई खारभूमी या बोर्डकालीन योजनेचे सन १९७१-७२ मध्ये काम पूर्ण करण्यात आले असून योजनेचे पुन:प्रापीत क्षेत्र २४ हेक्टर आहे. सन २०२२-२३ मध्ये योजनेच्या सर्वेक्षणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. कोंकण आपत्ती सौम्यीकरण योजने अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड यांनी नुतनीकरणाचा प्रस्ताव सादर करण्याचे आदेश विभागीय कार्यालयास दिले होते. त्यानुसार सदर योजनेचे रु.७८८.६८ लक्ष रकमेचे नुतनीकरणाचे अंदाजपत्रक जिल्हाधिकारी, रायगड यांना सादर करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या आदिवासी बांधव खावटी अनुदानापासून वंचित असल्याबाबत

**(२४) * ५८११८ श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या आदिवासी बांधवांना दरवर्षी दिले जाणारे खावटी कर्ज योजनेचे सन २०२२ या वर्षातील ४४० कोटी रूपये इतके कर्ज वाटप न झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेंर्तगत ७० टक्के धान्य व ३० टक्के रक्कम देण्याची तरतुद असून रुपये ४०००/- प्रमाणे ११ लाख ५० हजार आदिवासी कुटुंबांना खावटी कर्ज मिळण्यापासून वंचित राहावे लागले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय वा त्यानुसार खावटी कर्ज वितरण करण्यास विलंब केल्याप्रकरणी संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह या योजनेचा लाभ आदिवासी कुटुंबांना तात्काळ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) कोरोना काळात आदीवासी बांधवांची उपासमार होऊ नये म्हणून १ वर्षासाठीच (२०२०-२१) खावटी अनुदान योजना राबविण्यात आली होती.सदर योजनेमध्ये अनुसूचित जमाती लाभार्थी कुटूंबियांना रु. ४०००/- (रुपये चार हजार फक्त ) इतका लाभ अनुज्ञेय होता. यामध्ये रु.२,०००/- (रुपये दोन हजार फक्त) इतक्या रकमेचे वस्तुस्वरुपात वाटप करण्यास व रु.२,०००/- (रुपये दोन हजार फक्त) इतकी रक्कम लाभार्थ्यांच्या राष्ट्रीयकृत बँक/ डाक खात्यामार्फत थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात करण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता.

खावटी अनुदान योजनेंतर्गत ११,१०,३१२ लाभार्थी कुटुबांना रुपये २,०००/- (रुपये दोन हजार फक्त) त्यांच्या बँक /पोस्ट खात्यावर जमा करण्यात आले आहेत. तसेच प्रकल्प अधिकारी व आदिवासी विकास महामंडळाच्या यंत्रणेमार्फत ११,०५,४४१ लाभार्थ्यांना किट वाटप करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील भातसा धरणाचा कालवा फुटून शेतपिकांचे झालेले नुकसान

**(२५) * ५६८१९ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अजित पवार (बारामती), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील भातसा धरणाच्या आवरे गावाजवळील कालवा फुटल्यामुळे १०० एकर क्षेत्रात लाखो लिटर पाणी गेल्याने भात शेती व शेतमालाचे नुकसान झाल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ५४ किलोमीटर लांबीच्या कालव्याच्या देखभालीसाठी शासनाने केवळ एकच कर्मचारी तैनात केला असून त्याच्याकडून पाणीपट्टी वसुली व अन्य तदनुषंगिक कामे देखील करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गळती थांबविण्याकरिता रब्बी हंगामासाठी सोडण्यात येणारे पाणी बंद करण्यात आल्याने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी नुकसानभरपाईची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कालव्याची दुरुस्ती व त्याच्या देखभालीसाठी कर्मचारी संख्या वाढवून शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करुन त्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

भातसा उजवा तीर कालव्याद्वारे कोकण हंगाम २०२२-२३ च्या सिंचन आवर्तनाकरिता कालव्यामध्ये सुमारे २५० cusec विसर्ग सुरु असताना दि. ०४/०१/२०२३ रोजी कि.मी. १५ मधील सा. क्र. १४/५७० मी मध्ये भराव खचल्याचे निदर्शनास आले.

भातसा उजवा कालवा लगत असलेल्या आवरे गावात सर्वेक्षणानुसार, एकूण ११.६७ हेक्टर शेतीचे नुकसान व संबंधित क्षेत्रातील शेतीचे बांध काही प्रमाणात वाहून गेल्याचे आढळते.

(२) हे खरे नाही.

भातसा उजवा तीर कालव्यावर सिंचन व्यवस्थापनाकरिता शाखानिहाय तांत्रिक कर्मचाऱ्यांची नेमणुक करण्यात आली आहे. तांत्रिक कर्मचाऱ्यांचे अंतर्गत उपविभागाच्या आस्थापनेवर असलेले २ मजुर व दरवर्षी प्रापणसुची अंतर्गत मंजुर बाह्य अभिकरणाद्वारे पुरवण्यात येणाऱ्या मनुष्यबळाचा वापर करुन पाणीपट्टी वसुली व अनुषंगिक कामे केली जातात.

(३) हे खरे नाही.

भातसा उजवा तीर कालवा दि. ०४/०१/२०२३ रोजी क्षतिग्रस्त झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर तात्काळ सिंचन आवर्तनाकरिता सोडलेले पाणी पूर्णपणे बंद करण्यात आले होते. व यांत्रिकी विभागामार्फ़त आपत्कालीन दुरुस्ती करून दि. ०९/०१/२०२३ रोजी सिंचन आर्वतनाकरिता कालव्याव्दारे करण्यात येणारा पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात आला होता.

(४) दिनांक ०४/०१/२०२३ रोजी क्षतिग्रस्त झालेल्या कालव्याची आपत्कालीन दुरुस्ती विभागामार्फ़त करण्यात आलेली आहे. भातसा उजवा तीर कालव्याचे आयुर्मान सरासरी ३५-४० वर्ष इतके असुन कालव्याची गळती रोखण्याचे व मजबुतीकरणासाठी भरावास अस्तरीकरण प्रस्तावित करण्याचे नियोजन आहे.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीचे महसूल, कृषी व जलसंपदा विभागामार्फत पंचनामे करण्यात आलेले आहेत. कृषी विभागामार्फत नुकसानीचा अहवाल प्राप्त झाला असून नुकसान भरपाईची रक्कम रु.१.६७ लक्ष अदायगीची कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जव्हार (जि.पालघर) तालुक्यात नगर परिषदेमार्फत करण्यात येणाऱ्या विकासकामांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(२६) * ५७११४ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) येथे नगर परिषदेमार्फत रस्ते रुंदीकरण, खडीकरण, डांबरीकरण, विश्रामगृह, सांस्कृतिक गृह तसेच आदिवासी विकास भवन इमारतीचे बळकटीकरण करणे आदि विविध ५९ विकास कामांकरिता कोट्यवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाला असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी नगरपरिषदेचे तत्कालीन मुख्य अधिकारी, नगर अभियंता आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, कर्मचारी आणि ठेकेदार यांच्या विरोधात जव्हार पोलीस ठाण्यात दिनांक ३० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी तक्रार दाखल करुनही अद्याप यावर पोलीसांकडून कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नगर परिषदेच्या अधिकाऱ्यांनी विकास कामे घेताना तांत्रिक मंजुरीसा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्रस्ताव नस्ती न पाठविता बनावट सही व शिक्के यांचे आधारे बेकायदेशीररित्या तांत्रिक मंजुरी घेतल्याची अनेक प्रकरणे निदर्शनास आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबिधतांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) जव्हार नगपरिषदेमधील विकास कामामध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत दिनांक ०३/०२/२०२३ रोजी तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे.

(२) जव्हार नगरपरिषदेचे मुख्याधिकारी व इतर कर्मचारी यांचे विरोधात स्थानिक लोकप्रतिनिधींनीकडून दि. ३० ऑक्टोबर, २०२२ रोजी जव्हार पोलीस ठाणे येथे लेखी स्वरुपात तक्रार प्राप्त नाही.

परंतु अशा आशयाचे सन २०२१ मध्ये तीन व माहे एप्रिल, २०२२ मध्ये एक तक्रार अर्ज प्राप्त होते. सदर तक्रार अर्ज नगरपालिका प्रशासकीय कामकाजाशी संबंधित एकाच आशयाचे असल्याने एप्रिल, २०२२ मधील अर्ज जव्हार पोलीस ठाणे मार्फत दिनांक ३१/०५/२०२२ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयास पाठवून इतर तीन अर्ज दप्तरी दाखल केले आहेत. जिल्हाधिकारी यांनी सदर प्रकरणी चौकशी समिती गठीत केली आहे.

(३) व (४) जव्हार नगरपरिषदेतील एका कामासंदर्भात अंदाजपत्रकावर बनावट सह्या व शिक्के मारुन दस्ताऐवज तयार करुन फसवणूक केल्याचे निर्दशनात आल्याने संबंधित ठेकेदाराविरुद्ध जव्हार पोलीस ठाणे येथे दि.३१/०८/२०२१ रोजी गु.र.क्र. ७७/२०२१, भा.दं.वि. कलम ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४७२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीविरुद्ध मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोरची (जि.गडचिरोली) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत असलेल्या शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थी गॅस्टोने बाधीत झाल्याबाबत

**(२७) * ६०३४७ श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरची (जि.गडचिरोली) येथील एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प अंतर्गत शासकीय आश्रमशाळेतील ९ विद्यार्थी गॅस्ट्रोने बाधीत झाल्यामुळे त्यांना ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे दिनांक २६ डिसेंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी यांच्या अहवालानुसार विद्यार्थ्यांना दुषित अन्न व पाणी दिल्यामुळे गॅस्ट्रोची लागण होत असल्याचे निदर्शनात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबत कोणती उपाययोजना केली तसेच यास जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली अंतर्गत शासकीय आश्रमशाळा कोरची येथील ९ विद्यार्थीनींना हगवण, उलटी व मळमळचा त्रास झाल्याने दि. २६ डिसेंबर, २०२२ रोजी सदर विद्यार्थीनीना उपचाराकरिता ग्रामीण रुग्णालय कोरची येथे भरती करण्यात आले होते.

(२) हे खरे नाही.

(३) ग्रामीण रुग्णालय, कोरची यांच्या साथीच्या अंतीम अहवालानुसार विद्यार्थांना हगवण झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची आरोग्य पथकाद्वारे तपासणी करण्यात आली आहे. जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा गडचिरोली यांनी शासकीय माध्यमिक आश्रमशाळा कोरची येथील पाणी पिण्यास योग्य असल्याचा अहवाल दिलेला आहे. विद्यार्थ्यांना शुध्द पाणी उपलब्ध व्हावे याकरिता RO ची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

विद्यार्थ्यांनी कोणतेही बाहेरचे पदार्थ / वस्तू खाऊ नये तसेच इतर ठिकाणचे पाणी पिऊ नये अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. सद्यस्थितीत सदर शाळेमध्ये सर्व विद्यार्थ्यांचे आरोग्य सुस्थितीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कुरवळ जावळी (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील धरणाला**
**मोठ्या प्रमाणात गळती लागल्याबाबत**

**(२८) * ५६८२२ श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुरवळ जावळी (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील धरणाला मोठया प्रमाणात गळती लागल्याने धरणाखालील गावातील ग्रामस्थांच्या जीवितास धोका निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धरणाला लागलेल्या गळतीबाबत स्थानिक ग्रामस्थांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी करुनही दखल घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर धरणाच्या गळतीकडे लक्ष न दिल्यास तिवरे धरणाची पुनरावृत्ती होण्याची शक्यता वर्तविली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन धरणाची दुरुस्ती करणे व यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे.

ल. पा. योजना कुरवळ ता. खेड या योजनेच्या well type outlet मधून गळती असल्याचे दिनांक १२/१२/२०१८ रोजी निदर्शनास आलेले आहे.
(२) हे अंशतः खरे आहे.

ल. पा. यो. कुरवळ, ता. खेड या योजनेच्या गळतीबाबत ग्रामस्थांनी दि. ०२.०१.२०२३ रोजी तहसिलदार खेड यांची समक्ष भेट घेऊन तक्रार केली आहे. योजनेच्या पावसाळा पुर्व व उत्तर तपासणी अहवालामध्ये सदर गळतीची नोंद घेण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने सदर गळतीबाबत धरण सुरक्षितता संघटना, नाशिक यांची योजनेच्या क्षेत्रीय स्थळी भेट देऊन गळती प्रतिबंधक उपाययोजना सुचविणेबाबत विभागीय कार्यालयावरुन कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण उपविभाग दापोली यांनी दि. १६.०१.२०२३ रोजी धरण सुरक्षितता संघटना नाशिक येथे समक्ष उपस्थित राहुन संबधित अधिकारी यांचेशी चर्चा करण्यात आली. सदर चर्चेदरम्यान धरण सुरक्षितता संघटना, नाशिक यांनी मागणी केल्यानुसार आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करणेत आलेली आहे. तसेच सद्यस्थितीत धरणाच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने दि.२६/०१/२०२३ पासुन मुख्य विमोचकामधुन विसर्ग सुरु केलेला आहे.
(३) हे खरे नाही.

योजनेच्या मातीधरणामधुन गळतीमधुन येणारे पाणी नितळ स्वच्छ असुन योजनेस कोणताही धोका दिसुन येत नाही.

(४) धरण सुरक्षितता संघटना नाशिक यांचेकडुन प्रस्तावित गळती प्रतिबंधक उपाययोजना सुचवल्यानंतर योजनेची निवीदा जीवंत असल्याने संबधीत ठेकेदाराकडुन करुन घेणेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्रमुख नेत्यांच्या सुरक्षिततेबाबत

**(२९) * ५६७८० श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशाचे विद्यमान केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री यांना जिवे मारण्याची धमकी देण्यात येवून धमकीमध्ये १०० कोटी रुपयांची खंडणी मागण्यात आली असून ती न दिली गेल्यास बॉम्ब स्फोटात उडवून देण्याची धमकी देण्यात आल्याची बाब दिनांक १४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धमकी देणारा इसम बेळगाव (कर्नाटक) येथील कारागृहातील कैदी असून त्याचा नागपूर येथील खूनाशी संबंध असल्याचे उघड झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच कणेरा-रहाटगाव नाका (जि.अमरावती) येथे विधानसभा सदस्य, श्री.बच्चू कडू यांना दुचाकी वाहनाने धडक देवून झालेल्या अपघातामागे घातपाताची तक्रार नोंदवली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणामुळे प्रमुख नेत्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर असून काही लोकांना आवश्यकता नसताना सुरक्षा पुरविली जात असून अतिमहत्वाच्या व महत्वाच्या लोकप्रतिनिधींच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून सखोल चौकशी करून अतिमहत्वाच्या व महत्वाच्या व्यक्तींना सुरक्षा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) धमकी देणारा इसम हा बेळगाव (कर्नाटक) येथील कारागृहातील कैदी असल्याचे आढळून आले आहे. तथापि, त्याचा नागपूर येथील खुनाशी संबध असल्याची बाब आतापर्यत झालेल्या तपासात उघड झालेली नाही.
(३) पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर कार्यक्षेत्रा अंतर्गत पोलीस स्टेशन, गाडगेनगर हद्दीतील आराधना चौक, कठोरा नाका या ठिकाणी अज्ञात मोटारसायकलस्वाराने भरधाव वेगाने मा.आमदार श्री. ओमप्रकाश उर्फ़ बच्चु कडू यांना धडक दिली. त्यामुळे, ते खाली पडून जखमी झाले.

नमुद घटनेबाबत अपघातासंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती शहर येथे दि. ११-०१-२०२३ रोजी अ.प.६०८/२०२३ रोजी भादवि कलम २७९, ३३७ तसेच मोटार वाहन कायदा कलम १७७, १८४, १३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून घातपाताबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(४) व (५) राज्यातील अतिमहत्त्वाच्या व महत्त्वाच्या राजकीय व्यक्ती व इतर व्यक्तींना असलेल्या संभाव्य धोक्याचा वेळोवेळी आढावा घेऊन त्यांना वर्गवारी सुरक्षा प्रस्तावीत करण्यासाठी शासनपत्र गृहविभाग

दि.३१-०३-१९८६ व शासन परिपत्रक दि. १८-०९-२००७ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीने सादर केलेल्या अहवालाचे पुर्नविलोकन शासननिर्णय गृहविभाग दि. ०१-१२-२०१४ अन्वये स्थापन केलेल्या मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली पुनर्विलोकन समितीकडून वर्गवारी सुरक्षा प्रदान करण्याबाबत अंतिम निर्णय घेतला जातो. त्यामुळे, अतिमहत्त्वाच्या व महत्त्वाच्या लोकप्रतिनिधींच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष होत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद येथे पोलीस सहाय्यक आयुक्त यांनी महिलेचा केलेला विनयभंग**

**(३०) * ५६७८१ श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.विनोद निकोले (डहाणू), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहाय्यक पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर (श्री.विशाल ढुमे) यांनी पहाटे २ वाजता दारूच्या नशेत एका कुटुंबाच्या घरात जाऊन मारहाण करीत विवाहितेचा विनयभंग केल्याची घटना दिनांक १५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सिटी चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून सहाय्यक आयुक्तांना तात्काळ अटक न करता फक्त गुन्हे शाखेकडून कंट्रोल रुमला बदली करून त्यांना एक प्रकारे अभयच देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्याअनुषंगाने संबंधिताना निलंबित करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, पोलीस खात्यामार्फत अशा घटनांची भविष्यांत पुनरावृत्ती होऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२), (३) व (४) सहायक पोलीस आयुक्त श्री.विशाल ढुमे हे घटना घडली त्या दिवशी सहायक पोलीस आयुक्त, क्राईम, उस्मानपुरा या पदावर कार्यरत होते. त्यांनी अशा प्रकारचा गुन्हा केला असल्यामुळे व त्यांच्यावर एफ.आय.आर दाखल झाल्यामुळे पोलीस आयुक्त औरंगाबाद शहर यांनी तात्काळ त्यांच्याकडील सर्व पदभार काढून त्यांना नियंत्रण कक्ष येथे संलग्न केले व त्यांच्याकडे कोणतेही कार्यकारी व अकार्यकारी पद दिले नाही.

तसेच सिटीचौक पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्याचा संपूर्ण तपास २४ तासात केल्यानंतर सहायक पोलीस आयुक्त श्री.विशाल ढुमे यांचा सहभाग निष्पन्न झाल्यामुळे त्यांना दि. १६/०१/२०२३ रोजी १०:५८ वा. अटक केली आहे.

तदनंतर शासनाच्या आदेश क्रमांक: मपोसे-१०२३/प्र.क्र.३६/पोल-२ दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजीच्या आदेशान्वये श्री. विशाल ढुमे यांना दिनांक १६/०१/२०२३ पासून म्हणजेच अटकेच्या दिनांकापासून शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.